दाखल दिनांक – ०१/०१/२०१८
नोंदणी दिनांक – ०१/०१/२०१८
निकाल दिनांक – १०/०७/२०१९
कालावधी – वर्ष ०१, म.०६, दि.०९

**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अंजनगाव सुर्जी यांचे न्यायालय,**
(पिठासीन अधिकारी एम.एस.काळे)

नियमित दिवाणी दावा क्र.१/२०१८ नि.क्र. १७

**युसुफअली रहेमतअली,**
वय–४५ वर्ष, धंदा–मजुरी,
रा. काजीपुरा,अंजनगाव सुर्जी,
ता.अंजनगाव सुर्जी,जि.अमरावती. ...... **वादी**.

..... **विरुध्द** .......

१) **कलीमाबी मर्द रहेमतअली**,
वय–७० वर्ष, धंदा–घरकाम,

२) **लियाकतअली मर्द रहेमतअली**,
वय–५५ वर्ष, धंदा–मजुरी,
दोघेही रा. काजीपुरा,अंजनगाव सुर्जी,
ता.अंजनगाव सुर्जी,जि.अमरावती. ...... **प्रतिवादी**.

***दावाः– उद्घोषणेचा व निरंतर मनाई हुकूमाचा .***

वादींतर्फे विद्वान अधिवक्ता श्री.पी.बी.किचंबरे
प्रतिवादीतर्फे दावा एकतर्फी

.........................

# न्यायनिर्णय

(१० जुलै,२०१९ रोजी पारित)

१) प्रस्तुतचा दावा हा उद्घोषणा व निरंतर मनाई हुकूम मिळण्याबाबत वादीने दाखल केला आहे.

२) वादीने वाद्पत्रात थोडक्यात कथन केले आहे की, वादी हे अंजनगाव सुर्जी येथील रहिवाशी असून वादीच्या वडिलांचे नाव रहेमतअली वल्द हिदायत अली असे होते व त्यांचे मालकी,ताब्याची मौजा अंजनगाव सुर्जी येथे मालमत्ता असून ती मालमत्ता नझुल शिट नंबर ११-डी,प्लॉट नं.१७५, एकुण क्षेत्र ३०७ चौरस मिटर या पैकी ६६ चौरस मिटर मधील धाबा मातीचे घर ही घरमय जागा आहे. सदर घरमय जागा ही दावा मिळकत आहे. सदर दावा मिळकतीचे मालक वादीचे वडील रहेमतअली वल्द हिदायत अली हे होते व त्यांनी सदर्हु दावा मिळकत जागेचे मृत्यू पत्र(वसीहतनामा) दि.२६/०२/२०१५ रोजी वादीचे नावे करुन ठेवले आहे, तसेच प्रतिवादींना सुध्दा वादीच्या वडिलांनी वेगळा मोबदला दिला आहे. त्यानंतर दि.२२/०५/२०१५ रोजी वादीचे वडील मयत झाले आहे. सदर दि.२२/०५/२०१५ पासुन वादी हे दावा मिळकतीचे मालक व ताबेदार आहे, दावा मिळकत जागेमध्ये वादीशिवाय इतर कुणीही राहत नाही. दि.२६/०२/२०१५ रोजीचे मृत्यू पत्र हे वादीचे वडील रहेमतअली वल्द हिदायत अली यांचे शेवटचे मृत्यूपत्र आहे. सबब सदरचे मृत्यू पत्रानुसार वादी हे वादातील घरमय जागेचे पुर्ण कायदेशीर मालक झाले असून त्या अनुषंगाने उद्घोषणा देण्यात यावी. तसेच प्रतिवादी क्र.१ ही वादीची आई आहे व प्रतिवादी क्र.२ हे वादीचे भाउ आहे. प्रतिवादी यांचेकडून सदर मृत्यू पत्रावरुन दावा मिळकत वादीचे नावे नोंद करण्यास अडथळा करण्यात येत आहे व दि.२०/१२/२०१७ रोजी वादीने

प्रतिवादींना नोटीस पाठवून तसा अडथळा करु नये असे कळविले आहे. तरी देखील प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीवरील ताब्यास अडथळा करीत आहे म्हणुन प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाई हुकूम पारित करण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

३) प्रतिवादी क्र.१ व २ यांना नि.६ अन्वये दावा समन्स लागु झाले आहेत तरी देखील त्यांना पुरेशी संधी देवूनही ते या प्रकरणात हजर झाले नाहीत, त्यामुळे प्रतिवादींविरुध्द प्रस्तुतचे प्रकरण एकतर्फा चालविण्याबाबत दि.२१/०२/२०१८ रोजी नि.१ खाली आदेश पारित करण्यात आला आहे.

४) अभिलेखावरील एकंदरीत कथने व युक्तीवाद विचारात घेवून माझ्यापुढे पुढील मुद्दे उपस्थित होत आहेत,त्यावरील निष्कर्ष खालील कारणेमिमांसेच्या आधारे देत आहे.

| **अ.क्र.** | **विचारार्थ मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | वादी सिध्द करतात काय की, त्यांचे वडिलांनी दि.२६/०२/२०१५ रोजीचे दावा मिळकती बाबतचे मृत्यूपत्र वादीचे हक्कात केले आहे ? | ...... होकारार्थी. |
| २) | वादी सिध्द करतात काय की, त्यांचा दावा मिळकतीवर कायदेशीर मालकी व प्रस्थापित ताबा आहे ? | ...... होकारार्थी. |
| ३) | वादी सिध्द करतात काय की, प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीवरील ताब्यास अडथळा करीत आहेत ? | ...... होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ४) | वादी हे मागणी प्रमाणे उद्घोषणेचा हुकूम मिळण्यास पात्र आहेत काय ? | ...... होकारार्थी. |
| ५) | वादी हे मागणी प्रमाणे निरंतर मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहे काय ? | ...... होकारार्थी. |
| ६) | आदेश व हुकूमनामा काय ? | ......दावा खर्चासह मंजुर. |

## कारणमिमांसाः–

५) दाव्यातील कथन सिध्द करण्याकरीता वादीने त्याच्या वतीने साक्षीदार क्र.१ म्हणुन स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र नि.७ वर दाखल केले आहे व वादीतर्फे साक्षीदार क्र.२ म्हणुन मोहम्मद राजिक शेख मेहमुद यांचा पुरावा नि.११ प्रमाणे नोंदविला आहे. वादीने नि.१३ ही पुरसीस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला आहे. वादीतर्फे नि.१२ हे मृत्यूपत्र(वसीहतनामा), नि.१४ ही आखीव पत्रीका, नि.१५ हे मृत्यू प्रमाणपत्र व नि.१६ ही उप अधिक्षक भूमी अभिलेख यांना वादीने दिलेल्या अर्जाची स्थळप्रत हा कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

६) वादी तर्फे विद्वान वकिलांनी असा युक्तीवाद केला आहे की, वादीच्या वडिलांनी दावा मिळकतीबाबतचे मृत्यूपत्र वादीच्या हक्कात केले आहे, सदर मृत्यूपत्रास वादीच्या वडिलांचे इतर वारस म्हणजेच प्रतिवादी यांनी संमती दिली होती. दावा मिळकतीवर वादीचा एकटयाचा ताबा आहे सदर बाब वादीच्या न्यायालयापुढील शपथेवरील पुराव्यावरुन व वादीतर्फे तपासण्यात आलेल्या

साक्षीदार क्र.२ च्या पुराव्यावरुन सिध्द होत आहे. तसेच नि.१२ हे मृत्यूपत्र व नि.१४ ही आखीव पत्रीका वादीच्या शपथेवरील पुराव्यास पुष्टी देत आहे म्हणुन वादीचा दावा मंजुर करण्यात यावा.

**<u>मुद्दा क्र. १ ते ५ बाबतः</u>–**

७) सदरचे सर्व मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्याने व त्याबाबत एकच पुरावा आलेला असल्याने विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विवेचन एकाचवेळी एकत्रीतरित्या करण्यात येत आहे.

८) या प्रकरणात वादीने शपथेवर कथन केले आहे कि, दावा मिळकतीचे मालक त्याचे वडील रहेमतअली वल्द हिदायत अली हे होते. वादीच्या शपथेवरील सदर कथनास नि.१४ ही आखीव पत्रीका दुजोरा देत आहे तसेच वादी याने शपथेवर असे कथन केले आहे कि, तो दावा मिळकतीचा मालक व ताबेदार आहे, नि.१२ या मृत्यू पत्राआधारे तो दावा मिळकतीचा मालक झाला आहे. वादीतर्फे साक्षीदार क्र.२ याने शपथेवर कथन केले आहे कि, नि.१२ या मृत्यू पत्राच्या वेळी तो हजर होता, त्याने असेही कथन केले आहे कि, दि.२६/०२/२०१५ रोजी दावा मिळकतीबाबत वादीचे वडील रहेमतअली वल्द हिदायत अली यांनी मृत्यूपत्र लिहिलेले आहे व त्यातील संपुर्ण मजकुर रहेमतअली वल्द हिदायत अली यांनी सदर साक्षीदार क्र.२ यांचे समक्ष व दुसरे साक्षीदार अब्दुल सईद शेख हबीब यांच्या समक्ष सांगितला होता, तो मजकुर यशवंत नाकोड यांनी लिहून घेतला आहे व तो मजकुर वादीच्या वडिलांना वाचून समजावुन सांगण्यात आला होता. सदर साक्षीदाराने भारतीय वारसा कायदयाच्या

कलम ६३ अन्वये नि.१२ हे मृत्यूपत्र सिध्द केल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. तसेच मुस्लीम कायदयानुसार मुस्लीम व्यक्तीला त्याच्या मालमत्तेपैकी त्याच्या अंत्यविधीचा खर्च व त्याचेवरील कर्ज सोडून १/३ मालमत्ते बाबत त्याच्या वारसांच्या संमतीशिवाय मृत्यूपत्र करता येते. या प्रकरणात वादीने शपथेवर कथन केले आहे कि, त्याचे वडिलांनी प्रतिवादींना सुध्दा वेगळा मोबदला दिलेला आहे व प्रतिवादींनी दि.२६/०२/२०१५ रोजीचे नि.१२ या मृत्यूपत्रास संमती दिलेली आहे. प्रतिवादींनी वादीचा उलट तपास घेवून व त्यांचा लेखी जबाब दाखल करुन वादीचे शपथेवरील सदर कथन नाकारलेले नाही. तसेच वादीच्या साक्षीदाराचा उलट तपास सुध्दा प्रतिवादींच्या वतीने घेण्यात आलेला नाही. सबब वादीचे दाव्यातील संपुर्ण कथन अबाधित राहिले आहे. त्यामुळे या प्रकरणात वादी कथन करतो त्याप्रमाणे नि.१२ या मृत्यूपत्रास(वसीहतनाम्यास) रहेमतअली वल्द हिदायत अली यांचे इतर वारस म्हणजेच प्रतिवादी यांची संमती होती हे वादीचे शपथेवरील कथन स्वीकारावे लागेल. सदर परिस्थितीत वादीने शपथेवर कथन केले आहे कि, प्रतिवादी हे त्याच्या दावा मिळकतीवरील ताब्यास अडथळा करीत आहे, त्यामुळे वादी हा विनंतीप्रमाणे उद्घोषणा व निरंतर मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे वादीचा प्रस्तुतचा दावा मंजुर करणे न्यायोचित होणार आहे. सबब मुद्दा क्र.१ ते ५ चे उत्तरार्थ होकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र.६ चे उत्तरार्थ पुढील आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १) | दावा खर्चासह मंजुर करण्यात येत आहे. |
| २) | असे उद्घोषित करण्यात येत आहे कि, दि.२६/०२/२०१५ रोजीचे रहेमतअली वल्द हिदायत अली यांच्या मृत्यू पत्राआधारे(वसीहतनाम्या |

| | |
|---|---|
| | आधारे) वादी हा मौजे अंजनगाव सुर्जी,ता.अंजनगाव सुर्जी,जि.अमरावती येथील मालमत्ता नझुल शिट नंबर ११–डी,प्लॉट नं.१७५, एकुण क्षेत्र ३०७ चौरस मिटर या पैकी ६६ चौरस मिटर मधील धाबा मातीचे घर या दावा मिळकतीचा मालक झाला आहे. |
| ३) | प्रतिवादी यांनी वादीच्या दावा मिळकत जागेतील ताब्यास अडथळा निर्माण करु नये असा निरंतर मनाई हुकूम देण्यात येत आहे. |
| ४) | प्रकरणातील दस्तऐवज नस्तीबध्द. |
| ५) | वरील प्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित) |

स्वा/–
(एम.एस.काळे)
दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),
अंजनगाव सुर्जी.

दिनांक १०/०७/२०१९